# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १(प्रतिनिधी) : देशाचा, गावाचा, पर्यायाने विभागाचा विकास करण्यासाठी तरूणांनी राजकारणात सक्रीय सहभाग घ्यावा असे आवाहन खा. रक्षा खडसे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात नेहरू युवा केंद्र संघटन, राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिकशास्त्रे प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. १ मार्च रोजी अभिरूप संसदेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून खासदार खडसे बोलत होत्या. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी होते. मंचावर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, लिड बँकेचे व्यवस्थापन प्रणवकुमार झा, सिनेट सदस्य नेहा जोशी व स्वप्नाली महाजन, नेहरू युवा केंद्राचे अजिंक्य गवळी, प्रा. उमेश गोगडीया, डॉ. संजय पाटील आदी उपस्थित होते.

खा. खडसे म्हणाल्या की, तरूणांमध्ये राजकारण ही पॅशन असायला हवी. महाविद्यालयापासून राजकारण समजून घेत सहभाग वाढवावा. आजही आमदार, खासदार यांच्याकडे कोणती कामे असतात याविषयी लोकांमध्ये संभ्रम आहे. राजकारण आणि प्रशासन सोबत असेल तर विकासाला गती मिळते. टिकेचे राजकारण न करता विकासाच्या भावनेतून राजकारणात या असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी श्री आयुष प्रसाद यांनी येत्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत तरूणांनी मोठ्या संख्येने मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले. राजकारणात तरूणांनी सहभागी व्हावे आणि विविध विषयांवर मत मांडावीत असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषतात प्रा. माहेश्वरी यांनी देशातील तरूणांची संख्या पाहता पुढचे शतक भारताचे असून अशावेळी त्यांना विधायक कामाला लावण्यासाठी उत्तम नेतृत्वाची गरज आहे. ते नेतृत्व तरूणांमधून तयार व्हावे त्यासाठी शिस्त, संवाद कौशल्य आदी गुणांची गरज असल्याचे प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले. यावेळी डॉ. सचिन नांद्रे, प्रा. अजय पाटील, प्रणवकुमार झा यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी मॉक पॉर्लमेंट मधील विजेते निर्भय सोनार, गुणवंत बोरसे, यांचा सत्कार करण्यात आला. तेजस पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अजिंक्य गवळी यांनी आभार मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. १(प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात मराठी राजभाषा दिवस आणि राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

मराठी राजभाषा दिनानिमित्त रावल्या वसावे यांनी या दिवसाचे महत्व सांगितले. मिना पावरा, वंती धानाका, मनिषा भोई, पुजा भोई, योगिता वळवी, माधुरी चित्ते, प्रतिभा सोनार, लखन पावरा, भादाबाई पावरा या विद्यार्थ्यांनी कविता वाचन केले. डॉ. स्वाती तायडे, प्रणाली सोनवणे, डॉ. रणजित पारधे, डॉ. संतोष खिराडे यांनी मार्गदर्शन केले. गुलाबसिंग वळवी याने सुत्रसंचालन केले तर दिपाली पाटील यांनी आभार मानले.

विज्ञान दिवसानिमित्त प्रियंका पवार या विद्यार्थिनीने शास्त्रज्ञांविषयी माहिती दिली. दिपाली पाटील हिने श्रध्दा – अंधश्रध्दा व विज्ञान या विषयावर पीपीटी सादरीकरण केले. योगिता वळवी हिने विज्ञान प्रश्नमंजूषा उपक्रम राबविला. राहुल शेमले याने सूत्रसंचलन केले तर मोनिका गावित हिने आभार मानले. विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी या दोन्ही कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेत सुरु असलेल्या ओपन हाऊस संस्कृतिक महोत्सवात प्रज्ञेश मराठे हा मिस्टर ओपन हाऊस ठरला तर यशस्विनी इंगळे हि मिस ओपन हाऊस ठरली.

या स्पर्धेचे डॉ. ए.के. गोस्वामी, भानुदास जोशी, तारीक अन्वर, राजीव अहमद, अर्चना काबरा यांनी परीक्षण करतांना परीचय फेरी, गटचर्चा याद्वारे परीक्षण केले. मिस्टर ओपन हाऊसचे प्रथम पारितोषिक प्रज्ञेश मराठे मिळाले तर द्वितीय पारितोषिक

## जनसंपर्क विभाग

अजिंक्य पवार व शुभम माळी यांनी मिळाले. मिस ओपन हाऊसचे प्रथम पारितोषिक यशस्विनी इंगळेला तर द्वितीय पारितोषिक लक्ष्मी कोहाड व मृणाल गरूडे यांना मिळाले. संचालक प्रा.जे.बी. नाईक, समन्वयक डॉ. जी.ए. उस्मानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. प्रा. सुजाता शिंदे, प्रा. दिपाली भोळे यांनी सहकार्य केले. पियुष पाटील व रेणुका जाधव यांनी कार्यकमाचे सुत्रसंचालन केले. प्रा.विश्वराज तायडे यांनी आभार मानले.

**बातमी क्र. ४**

जळगाव दि. १(प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतर्फे ५ मार्च रोजी 'पर्यावरण, भूशास्त्र आणि वायूमंडलीय संशोधनाच्या क्षेत्रातील प्रगती' या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

मंगळवार दि. ५ मार्च रोजी सकाळी १० वाजता कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचे उद्घाटन होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्रा.सतीष पाटील, प्रा. एन.एन. बंदेला हे प्रमुख पाहुणे राहणार असून, डॉ. भुपेंद्र बहादुरसिंग, प्रा. अशोक तेजनकर हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर. थोरात, संयोजक प्रा.एस.एन. पाटील, सचिव डॉ.के.पी. दांडगे यांनी दिली.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १ मार्च, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी